म. ग्रं. सं. ठाणें
विषय
सं. क्र. २९८




# शेगांव: संतस्थान

७

...तिक
...राष्ट्र

मराठवाडा-विदर्भ परिसर

REFBK-0011394



# शेगांव : संतस्थान

श्रीगजानन महाराज
यांचें शेगांव

भाग्याचा उदय ।
ते हे जोडे संतपाय ।।

* * *

ऐसें पुण्य शेगांवींचें ।
भाग्यवंत ते जन साचे ।
म्हणूनि श्रीगजाननाचे ।
चरण लाभले तयांना ।

ब. प. तांदळे - गुरुजी

REFBK-0011394

किंमत
६५
नये पैसे

वोरा अॅण्ड कंपनी पब्लिशर्स
प्रायव्हेट लिमिटेड, मुंबई २.

श्री : २४७

© १९६०
वोरा ॲण्ड कंपनी पब्लिशर्स
प्रा. लि. मुंबई २.

*

सांस्कृतिक महाराष्ट्र
दर्शनमाला : ३२
...विदर्भ परिसर

*

आवृत्ति पहिली : १९६०

*

किंमत ६५ नये पैसे

*

महाराष्ट्रांतील सांस्कृतिक केंद्रांचीं ऐतिहासिक पार्श्वभूमीवर रेखाटलेलीं भावरम्य बोलकीं शब्दचित्रें

*

प्रकाशक :

अ. ल. गाडगीळ
वोरा ॲण्ड कंपनी,
पब्लिशर्स प्रा. लि. करितां
३, राउंड बिल्डिंग,
काळबादेवी, मुंबई २.

*

मुद्रक :

ज. ग. जोशी,
जनार्दन प्रेस,
३९४ सदाशिव, पुणें २.

# विदर्भाचें संस्कृति-वैभव

महाराष्ट्राच्या घटकप्रदेशांतील विदर्भ-भूमि अत्यंत प्राचीन आहे. उपनिषत्कालापासून विदर्भाचे गौरवोल्लेख आढळतात. नर्मदा आणि कृष्णा या नद्यांच्या मधल्या प्रदेशांत विदर्भानें प्राचीन काळीं आपला सांस्कृतिक प्रभाव पाडला होता. महर्षि अगस्त्यांच्या तपस्तेजानें उजळून निघालेली लोपामुद्रा, भगवान् श्रीकृष्णाचें हृदय जिंकणारी रुक्मिणी आणि पुण्यश्लोक नलराजासाठीं वनवास पत्करणारी दमयन्ती या विदर्भभूमीच्याच कन्या.

इतिहास-काळांत सातवाहन, वाकाटक, कलचूरी, चालुक्य, राष्ट्रकूट आणि यादव या सर्व प्रसिद्ध राजकुलांनीं विदर्भाची गौरवशाली परंपरा वर्धिष्णु बनविली. वाकाटकांच्या काळांत तर विदर्भभूमि संस्कृति-वैभवाच्या अत्युच्च शिखरावर होती. गुप्तवाकाटकांनीं भारतीय इतिहासाचें सुवर्णयुग घडविलें—त्या वाकाटकांची राजधानी विदर्भांत नंदिवर्धन (नगरधन) येथें होती. राज्यकर्तृत्व, धर्म, साहित्य आणि कला या संस्कृतीच्या सर्व अंगांचें विदर्भानें पोषण केलें आहे.

'वैदर्भी रीति' विदर्भाच्या मातींतूनच फुललेली आहे. महाकवि भवभूति हा विदर्भाचाच पुत्र. महानुभावपंथसंस्थापक चक्रधरांचे गुरु गुंडम राऊळ, आदिकवि मुकुंदराज, द्वितीय दत्तावतार श्रीनरसिंह सरस्वती हे मूळचे विदर्भांतीलच.

— श्रीरामाच्या पाऊलखुणा उरीं सांठविणारें रामटेक, रुक्मिणी-स्वयंवराच्या मधुर स्मृतींत रंगणारी अमरावती, जैनांच्या परंपरेची जपणूक करणारा मुक्तागिरि, महाकालीची उपासना करणारें चंद्रपूर, श्रीगणेशाच्या आराधनेंत मग्न असणारीं आधाशा आणि कळंब हीं स्थानें, विदर्भपंढरी कौंडिण्यपूर आणि आधुनिक सन्त श्रीगजाननमहाराज यांचें शेगांव या विदर्भांतील कांहीं संस्कृति-केंद्रांचा परिचय या मालेंतून करून दिला जात आहे.

७१३९८

# शेगांव : संतस्थान

## श्रीगजानन महाराजांचें शेगांव

### शेगांव-दर्शन

तीर्थक्षेत्रें नि सृष्टिसौंदर्य-स्थळें पहाण्याच्या बाबतींत आणि खाण्यापिण्याच्या संबंधांत 'उत्तरेंत खावें नि दक्षिणेंत पहावें' असा एक लोकसमज मराठी जगतांत तरी रूढ आहे.

उत्तरेंत जितकीं म्हणून तीर्थक्षेत्रें आहेत तितकींच किंबहुना अधिकच दक्षिणेंत आहेत, आणि तीं निसर्गरम्य स्थळीं वसलेलीं आहेत. शिवाय तीं अत्यंत सुंदर शिल्पकृतीनें सुसंपन्न असल्यामुळें प्रेक्षणीय आहेत.

हीं दर्शनीय, प्रेक्षणीय पवित्र स्थळें कशीं आणि कां निर्माण झालीं याचाहि अन्योन्यसंबंध आहेच.

'भाग्याचा उदय । ते हे जोडे संतपाय ॥' अशीच स्थिति कांहीं कांहीं स्थळांच्या बाबतींत घडून आलेली दिसते.

शेगांव हें देखील असेंच प्रापंचिक जनांचें आत्मोद्धाराचें पवित्र स्थान आहे. आणि त्याला कारण श्रीगजानन महाराजांचें तेथलें पुण्यप्रद वास्तव्य होय.

हें शेगांव स्थळ मध्यरेल्वेच्या मुंबई-कलकत्ता मार्गावर आहे. मुंबई-कलकत्त्याच्या सर्वच गाड्या या स्थानकावर थांबतात. मुंबईकडून जलंब स्टेशनापासून शेगांव ७ मैल आहे आणि नागपूरकडून अकोला स्टेशनापासून शेगांव २३ मैल अंतरावर आहे.

शेगांवला दर गुरुवारीं आणि दर एकादशीला यात्रेचें स्वरूप येतें. इतर दिवसांत बाराहि मास भाविकांची अखंड ये-जा चालू असतेच.

शेगांवचें मूळचें नांव 'शिव-गांव' होतें; खरोखर तें शिव म्हणजे कल्याणप्रद असेंच स्थान आहे. तेथें शिवाचें – महादेवाचें – लहानसें मंदिरहि आहे. तेथील ग्रामीणांना अन्नवस्त्राची वाण कधींच पडली नाहीं. कालांतरानें 'शिवगांव' या शब्दाचा अपभ्रंश होऊन 'शेगांव' असें नांव प्रचारांत आलें व तेंच रूढ झालें.

शेगांव बुलढाणा जिल्ह्यांतील खामगांव तालुक्यांत आहे. खामगांवापासून त्याचें अंतर १० मैल आहे. येथें नगरपालिका आहे. ती व्यापाराची मोठी पेठ आहे. आजूबाजूचा कापूस नि धान्य यांचा मोठा व्यापार येथें चालतो. दर मंगळवारीं येथें बाजार भरतो.

शेगांवची लोकसंख्या वीस हजारांवर आहे. गांवांत प्राथमिक शिक्षणाच्या बऱ्याच शाळा आहेत. एक हायस्कूलहि आहे.

शेगांवला जाण्या-येण्यासाठीं मुंबई-कलकत्ता मध्यरेल्वेच्या मुख्य मार्गाशिवाय खामगांव, जलंब, इत्यादि ठिकाणांहून प्रॉव्हिंशियल ट्रान्सपोर्टच्या बसेस अर्ध्या अर्ध्या तासानें सारख्या सुटत असतात. खामगांव ते शेगांव दर माणसीं पन्नास नये पैसे भाडें पडतें.

गांवांत प्रवाशांना उतरण्यासाठीं वसतिगृहें, भोजनालयेंहि आहेत.

## श्रीगजानन महाराजांचें आगमन :

संत हे परमेश्वराचें प्रतीक होत. ते सत्कृत्याचे, सद्धर्माचे प्रेरक असतात. ते जगत्कल्याणार्थ वावरत असतात. आणि ज्याची उणीव असेल त्याची आपल्या इच्छामात्रें करून परिपूर्ति करतात.

**पुण्य कर्म जनांत होई । संतदर्शन त्याच ठायीं ॥**
**होतसे लवलाही । यांत संशय नसे ॥**

याच कोटींतले श्रीसंत गजानन महाराज शेगांव (शिवगांव) मुक्कामीं दिनांक २३ फेब्रुवारीं १८७८ रोजीं अकस्मात् प्रविष्ट झाले.

परंतु श्रीगजानन महाराज हे कोण ? कोठले ? कोठून आले ? कसे आले ? पूर्वीं कोणत्या गांवीं यांचें वास्तव्य होतें ? त्यांचे आईवडील कोण होते ? ते कोणत्या वंशाचे ? त्यांची जात कोणती ? त्यांचें बालपण कोठें व कसें गेलें ? त्यांचें शिक्षण झालें होतें किंवा नाहीं ? झालें असल्यास त्यांचे गुरु कोण होते ? या बाबतींत कोणालाहि कधींच थांगपत्ता लागलेला नाहीं. महाराजांनींहि कधीं या बाबतींत कोणाजवळ एक शब्द देखील उच्चारला नाहीं. ते फारच कमी बोलत असल्यामुळें कुणा-भक्ताकडूनहि महाराजांशीं विशेष सलगीनें त्या बाबतींत विचारपूसहि केली गेली नाहीं हें साहजिकच. परंतु चिकित्सक चरित्रलेखकांकडूनहि तसा प्रयत्न केला गेला नाहीं, हें मोठें आश्चर्य !

श्रीगजानन महाराज कधीं कधीं आनंदांत, खुषींत आले आणि त्यांची लहर लागली तर मात्र ते वेदाच्या ऋच्या स्वर-सहित शुद्ध म्हणत असत. त्यावरून ते ब्राह्मण कुळांतले असावे व त्यांचा बालपणांत गुरुगृहीं किंवा पित्याच्या संगतींत संस्कृ-तचा अभ्यास झालेला असावा असा तर्क करायला जागा आहे.

कांहीं जरी असलें तरी ते सुसंपन्न विद्वान् ब्राह्मण माता-पित्याच्या पोटीं जन्माला आलेले सुसंस्कारयुक्त योगीराज होते हें निश्चित.

महाराज शेगांवांत जे प्रविष्टले ते दिगंबर अवस्थेंतच. आणि त्यांचें प्रथम दर्शन झालें तें देवीदास पातुरकर यांच्या मठाबाहेर पडलेल्या उष्टया पत्रावळींतील अन्नकण वेचून खात असतांना. बंकटलाल आगरवाला व त्यांचे मित्र दामोदरपंत कुळकर्णी यांना त्यांचें त्यावेळीं प्रथम दर्शन घडलें. त्यांनीं श्रीगजानन महाराजांची ही जी दिगंबर मूर्ति पाहिली ती त्या वेळीं ३० ते ३२ वर्षें वयाची होती.

सिद्ध पुरुषाचीं सर्व लक्षणें त्यावेळीं त्यांच्या व्यक्तिमत्त्वांत विकसित झालेलीं स्पष्ट दिसत होतीं. श्रीगजानन

महाराजांची अंगकाठी चांगली कसलेली होती. शरीर पिळदार होतें. वर्ण सांवळा होता. उंची भरपूर होती. ते आजानुबाहू होते. भाल- प्रदेश उंच नि भव्य होता. नेत्रांत दिव्य तेज होतें. एकंदरींत महाराजांकडे पाहिलें असतां मन आकर्षिलें जावें अशा स्वरूपाचेंच त्यांचें व्यक्तिमत्त्व होतें.



श्रीगजानन महाराज

परंतु त्यांच्या वृत्तींत जो वेडेपिसेपणाचा देखावा अन्य जनांना दिसत होता तशा वृत्तीचे ते मुळींच नव्हते. ते आपल्याच 'गणिगण गणांत बोते' या नाद-ब्रह्मांतच निमग्न असत.

महाराजांसंबंधीं दुसराहि एक तर्क केला जातो. इ. स. १८५७ च्या धामधुमीनंतर पुण्याहून पेशव्यांच्या कुटुंबांतील कांहीं मंडळी परागंदा झाली; व ती वऱ्हाडांत येऊन सातपुड्याच्या कडेकपारींतल्या खेड्यापाड्यांतून स्थिरावली. त्यांपैकींच एका खेड्यांत–पोपटखेडा गांवीं–गजानन महाराजांचे वाडवडील येऊन राहिले असावेत. महाराजांना स्वराज्याबद्दल आणि सत्तावनच्या स्वातंत्र्ययुद्धाबद्दल बरीचशी माहिती पण असावी. आणि म्हणूनच ते मौन धारण करून वागत असावेत असा तो तर्क आहे. तरीपण त्यांची ती स्वातंत्र्य-प्रेमी बुद्धि त्यांना मधून मधून जागृत करीत असावी, असें त्यांच्या १९०७ सालच्या लो. टिळकांच्या अकोला येथील जाहीर सभेला हजर असण्यावरून म्हणावेंसें वाटतें. अकोला येथें असतांना १९०७ मध्यें लो. टिळक चौकांत भरलेल्या जाहीर सभेंत लो.

टिळक यांचे शेजारीं व्यासपीठावर श्रीगजानन महाराज जातीनें हजर होते. नव्हे, लो. टिळकांच्या शेजारीं उजव्या बाजूला ते बसले होते. असें त्या वेळीं सभेला हजर असलेल्या म्हाताऱ्या मंडळींच्या आठवणीवरून दिसतें. कांहीं जरी असलें तरी वयाच्या ३० ते ३२ व्या वर्षापासून ते आपल्या योगसामर्थ्यामुळें लोकांत संत, योगी, अथवा अवलिया (अथवा कांहीं लोकांच्या मतें वेडापिसा) म्हणून प्रसिद्धीस आले; व पुढें ते लोकोद्धारक म्हणून वावरले ही गोष्ट मात्र खरी आहे.

**महाराजांची देहातीत अवस्था :**

श्रीगजानन महाराज हे पूर्ण विरागी पुरुष होते. त्यांची देहातीत स्थिति होती. त्यांना आपल्या देहाकडे पहाण्याची गरज नव्हती. सदा सर्वदा दिगंबर वृत्तींतच असावें. कांहीं काळ भक्तजणांनीं धोतर गुंडाळून द्यावें, पण तें त्यांनीं अल्प वेळच अंगावर ठेवावें, असें चाले.

ते पूर्ण योगी असल्यामुळें त्यांच्या देहाला थंडीवाऱ्यापासून, भूक तहान इत्यादि शारीरिक, मानसिक आधीव्याधीपासून कधींच त्रास झालेला दिसून आला नाहीं.

मनुष्यदेह धारण केल्यानंतर त्याचें सार्थक भगवत्प्राप्तींत आहे. म्हणून ते ‘ गणिगण गणांत बोते ’ असें सांकेतिक भाषेंत भजन करीत असत. त्यांत ते इतके तल्लीन होऊन जात कीं ‘ ब्रह्मानंदीं लागली टाळी । कोण देहातें सांभाळी ॥ ’ अशी त्यांची अवस्था होऊन जाई.

श्रीगजानन महाराज उजव्या हातानें डाव्या हातावर वाढलेल्या नखाग्रांनीं टाळी वाजवून भजन करीत. सारा हात रक्तबंबाळ होऊन जाई. त्याकडे त्यांचें लक्षहि नसे.

एकदां शेगांवास श्री. मोटे सावकाराच्या घरीं गोविंदबुवा टाकळीकर नांवाचे कीर्तनकार आले होते. त्यांचा एक घोडा फार खटचाळ होता. श्रीगजानन महाराज तो घोडा जेथें

बांधला होता त्या ठिकाणीं मध्यरात्रीच्या सुमारास आले आणि घोड्याच्या पायांत स्वस्थपणें 'गणिगण गणांत बोते' हें भजन करीत पहुडले. घोडा खिकाळला नाहीं, त्यानें लाथा झाडल्या नाहींत, तो चावला नाहीं. कांहीं धडपड केली नाहीं. तो अगदीं शांतपणें उभा होता. जणूं कांहीं भगवद्भक्ताच्या सांन्निध्यानें तोहि 'समाधींत स्थिरावला' होता.

दुसरा प्रसंग असाच त्यांच्या देहातीत वैराग्य वृत्तीचा आहे. बंकटलाल नांवाचे महाराजांचे भक्त त्यांना आपल्या मळ्यांत मक्याचीं कणसें खावयास एकदां घेऊन गेले. सोबत गांवांतली बरीचशी मंडळीहि होती. झाडाखालीं कणसें भाजण्यासाठीं विस्तव पेटविला मात्र. झाडावर आग्या मोहोळाचीं मोठालीं पोळीं होतीं. तीं उठलीं. मधमाशा उठल्या आणि त्यांनीं खालीं जमलेल्या माणसांवर हल्ला चढविला. सारी मंडळीं देहाच्या भीतीनें पळालीं. परंतु देहातीत झालेले पूर्ण वैराग्यशील श्रीगजानन महाराज दिगंबर अवस्थेंत तेथेंच बसून राहिले. मधमाशांना स्वात्मोद्धाराचें स्थान मिळाल्यामुळें त्यांना किती आनंद झाला असेल ! श्रीगजानन महाराज आनंदमग्न होऊन शांत चित्तानें तेथेंच बसले होते.

**जीवितकार्य :**

श्रीगजानन महाराजांचा सारा जीवनकाळ शेगांवींच गेला. त्यामुळें त्यांच्या अवतारकार्याचें व लोकोद्धाराचें मुख्य स्थान शेगांवच झालेलें होतें.

खरें पाहिलें असतां संतजीवनांत, परमार्थी कार्यांत चमत्कारालाच फार महत्त्व दिलें जातें. परंतु जे खरे संतमहात्मे असतात, ते असल्या चमत्कारापासून शेंकडों मैल दूर असतात. परमेश्वरी इच्छेनें जगत्कल्याणार्थ त्यांच्या हातून जे कांहीं अद्भुत, मानवदृष्टीला अगम्य, अतर्क्य कार्य घडून येतें त्यालाच लोक चमत्कार समजतात.

११३९४

आत्मौपम्येन सर्वत्र समं पश्यति योऽर्जुन ।
सुखं वा यदि वा दुःखं स योगी परमो मतः ॥

अशा प्रकारच्या गीतेच्या शिकवणीप्रमाणें लोककार्य करण्यांतच खरा चमत्कार आहे; व हीच खरी त्यांची प्रसिद्धी होय.

श्रीगजानन महाराजांच्या जीवनांत जे जे चमत्कार वर्णिलेले आहेत ते सारे याच कोटींतले आहेत. परंतु त्याकडे पहाणाऱ्या भाविकांची दृष्टि मात्र निराळीच असते.

श्रीगजानन महाराज फारसें बोलत नसत. आत्मानंदांतच असले तर 'गणिगण गणांत बोते' असा नामगजर ते करावयाचे. भक्तगण येऊन बसले कीं, त्यांना "चिलीम भर" "चिलीम भर" असें म्हणावयाचें. नाहींतर कधीं कधीं "काशी मध्यें एक शामा होता," असें म्हणत रहायचे. या त्यांच्या बोलण्यांत गूढार्थ भरला होता तें कोणालाच कधीं कळलें नाहीं. इतर वेळीं प्रसंगोपात्त थोडें फार सूचक ते बोलत असत. आणि त्यामुळें जें कांहीं अद्भुत, अगम्य आणि अतर्क्य कार्य घडून येत असें त्यामुळें भाविक, श्रद्धाळु, मुमुक्षुजन महाराजांकडे आकृष्ट होऊन जात असत.



देहातीत अवस्था

विदर्भांतले लो. टिळकाचे समकालीन कै. श्रीमंत दादासाहेब खापर्डे यांच्यासारखे विद्वान् कायदेपंडित देखील महाराजांना आदरयुक्त मनानें, भाविक वृत्तीनें फार मानीत असत.

## लो. टिळकांना प्रसाद

लो. टिळकांना राजद्रोहाच्या आरोपाखालीं शिक्षा झाली तेव्हां कै. दादासाहेब खापर्डे हे आपल्या मित्रमंडळीसह शेगांवीं श्रीगजानन महाराजांच्या दर्शनास आले होते तेथे त्यांनीं महाराजांना लो. टिळकांच्या शिक्षेची वार्ता सांगितली. आणि "अशा वेळीं राष्ट्राच्या कार्यासाठीं लो. टिळकांची सुटका झाली पाहिजे, असें आपण कांही तरी करावें" अशी विनंती केली. श्रीगजानन महाराजांनीं हास्य केलें आणि जवळच्या दोन भाकरी उचलून "हा माझा प्रसाद टिळकांना द्या" म्हणून त्या कै० दादासाहेबांच्या हातांत दिल्या. त्यांनीं सांगितलें कीं, "टिळक तुरुंगांत राहिल्यास देशाचें नुकसान होणार नाहीं. उलट फार मोठा फायदाच होईल हें लक्षांत ठेवा."

कै. दादासाहेबांनीं महाराजांनीं दिलेला 'भाकरीचा प्रसाद' खरोखरच लो. टिळकांना नेऊन दिला, आणि तो लो. टिळकांनीं मोठ्या भक्तिभावानें ग्रहण केला. लो. टिळकांच्या तुरुंगवासामुळें भारताचा फार मोठा फायदाच झाला. कारागृहांत असतांनाच लो. टिळकांनीं 'गीतारहस्य' हा अलौकिक ग्रंथ लिहून काढला.

असे प्रसंग श्रीमहाराजांच्या जीवनांत कितीतरी घडलेले आहेत. त्यामुळें त्यांचा भक्तवर्ग हजारोंच्या संख्येनें वाढत गेला. आणि आजहि तो भाविक श्रद्धेनें दिवसेंदिवस महाराजांच्या समाधीनंतरहि वृद्धिंगतच होत आहे.

महाराजांच्या ह्या अशा अनेक चमत्कारमय कार्यामुळें त्यांनीं लोकांना एकेका तत्त्वाचें सूचकपणें सद्धर्मप्रसारक तत्त्वज्ञानच शिकविलेलें आहे.

त्यांचे तें चमत्कारमय जीवनकार्य 'श्रीगजाननविजय' ग्रंथांत सविस्तर वर्णिलेलें आहे. नाल्यांतल्या खळग्यांतून तुंबा बुडवून तो भरून पाणीं आणणें, मरणोन्मुख स्थितींतून नुसत्या तीर्थोदकानें आजाऱ्याला खडबडून उठवून बसविणें. भास्कर

शेतकऱ्याच्या शेतांतली ठणठणीत कोरडी विहीर पाण्यानें तुडूंब भरणें, स्वतःच पलंग पेटवून ' नैनं छिन्दन्ति शस्त्राणि नैनं दहति पावकः । ' हें तत्त्वज्ञान ब्रह्मगिरी महंताला पटवून देणें, इतकेंच नव्हे तर आजच्या विज्ञानयुगांतल्या यांत्रिक वस्तूंवरहि आपली सत्ता चालवून दाखविणें, असे त्यांचे अनेक चमत्कार वर्णिलेले आहेत.

श्रीगजानन महाराजांची आध्यात्मिक योग्यता अत्यंत श्रेष्ठ पातळीवरची होती. ते थोर योगी पुरुष आहेत याच दृष्टीनें आध्यात्मिक मुमुक्षु त्यांच्याकडे पहात असत – आणि तशी श्रद्धा पण बाळगीत असत. श्रद्धाळू भाविक जन तर ते आपलीं मनोवांछितें पुरविणारी परमेश्वराची मूर्तिच मानीत असत. आणि आजहि, महाराजांच्या समाधिनंतरहि तीच परिस्थिति भक्तजनांची आहे.

महाराजांची कृपादृष्टि मानवाकडेच होती असें नव्हे. त्यांना पशुपक्ष्यांचाहि फार लळा होता. ते श्रीरामप्रभूचे भक्त होते. त्यांच्या अंतर्ज्ञानामुळेंच शेगांव मुक्कामीं त्यांची इष्टदेवता श्रीराम, सीतामाई व बंधु लक्ष्मण यांच्या मूर्ति सांपडल्या; नंतर त्या खोदून प्रकाशांत आणल्या हें सर्वश्रुत आहे. महाराज रामदूत हनुमंताच्या वानरकुळीवरहि फार प्रेम करीत असत. त्यांच्याशीं खोड्याहि ते फार करीत. आणि हें करीत असतांना ते त्या वानरांशीं तादात्म्य पावत असत. त्यांच्या आसपास कुत्रींहि वावरत असत. पक्ष्यांत मोर आणि कबुतरें महाराजांना विशेष आवडत. मोरांशीं, कबुतरांशीं ते फार वेळ खेळत बसत. आणि त्यांत ते सर्व कांहीं विसरून जात. खाण्यापिण्याचीहि त्यांना पर्वा नसे. कोणी भक्तजनानें त्यांच्याजवळ कांहीं खायला आणून दिलें तर मात्र त्याच्यांतले चार दोन घांस ते अवश्य खात; आणि बाकीचें सारें त्या आपल्या जिवलगांसमोर ठेवून देत असत. चिलीम मात्र ओढण्यांत ते सदैव मग्न असत. चिलीम संपली कीं पुनः कोणाला तरी ते म्हणायचे " चिलीम भर. "

असा त्यांचा नित्य वर्तनक्रम असला तरी ते मानवांच्या कल्याणार्थ आपला देह कष्टवीत होतेच. मात्र हें सर्व करीत असतांना महाराजांनीं आपली शिष्यपरंपरा केली नाहीं, वाढविली नाहीं, हें विशेष लक्षांत येण्यासारखें आहे.

ते म्हणत असत कोण गुरु अन् कोण शिष्य ? ज्यानें त्यानें आपलें हित पाहून घ्यावें. हें जरी सारें खरें असलें तरी त्यांच्या निकट सान्निध्यांत असणारे कांहीं एकनिष्ठ सेवकशिष्य होतेच. बंकटलाल आगरवाला, भास्करराव पाटील, हरी कुकाजी पाटील, सुखदेव नारायणराव पाटील, रामचंद्र पाटील, दत्तु भिकाजी वगैरे मंडळी त्यांत प्रामुख्यानें होती.

**सन्नीतीला सोडुं नका । धर्मवासना टाकुं नका ।**
**भेदाभेद मनीं आणुं नका । तरीच शक्ति वाढेल ॥**

महाराजांच्या एकंदर जीवितकार्याचें व शिकवणीचें थोडक्यांत असेंच स्वरूप होतें.

**निजधामगमन :**

**मातेचि पार्था निजअंतकाळीं । जो ध्यातसे तो हृदयांतराळीं ॥**
**कलेवरा टाकुनि तत्क्षणीं तो । नभीं नभाचे परि मीच होतो ॥**

'अंतकाळीं जो ममत्वाचा त्याग करून माझें स्मरण करतो तो मत्स्वरूपीं मिसळून जातो.'

श्रीगजानन महाराज शेगांवीं आले. त्यांनीं तेथें पस्तीस वर्षें वास्तव्य केलें. आतां त्यांचें वय पासष्ट सदुसष्ट वर्षांचें झालें होतें. महाराजांनीं आपला समाधिस्थ होण्याचा दिवस आपल्या भक्तमंडळींना आधींच सांगून ठेविला होता.

तिथि भाद्रपद शुद्ध पंचमी शके १८३२ दिनांक ८ माहे सप्टेंबर १९१० गुरुवारीं श्रीगजानन महाराज समाधिस्थ झाले.

महाराज देहरूपानें जरी आज आपल्यांत दिसत नसले तरी त्यांच्या अवतारकार्याचा किर्तिध्वज त्यांच्याच आज्ञेनुसार बांधण्यांत आलेल्या श्रीराममंदिराच्या सुवर्णकळसावरील

ध्वजाप्रमाणें उंच अखंड फडकत आहे. त्यांचा कीर्तिसुगंध दूरवर दरवळत आहे. भक्तजनांना, भाविकांना आनंदित करीत आहे. त्यामुळें त्यांचीं मनें पुलकित होत आहेत. महाराजांच्या समाधि-नंतरहि विदर्भांतीलच नव्हे तर त्यांचा किर्तिसौरभ जेथवर पसरलेला आहे तेथपासून सुशिक्षित-अशिक्षित, तरुण-वृद्ध, स्त्री-पुरुष, श्रीमंत-गरीब, आस्तिक-नास्तिक सारेच लोक आजहि श्रीगजानन महाराजांच्या ठायीं नितान्त श्रद्धा बाळगून शेगांवला त्यांच्या दर्शनार्थ हजारोंच्या संख्येनें येत असतात. आणि ही संख्या सालोसाल हजारोंच्या चक्रवाढगतीनें सारखी वाढतच आहे.

## आराध्य देवतेचें मंदिर :

शेगांवला श्रीगजानन महाराजांच्या दर्शनास आल्या बरोबर प्रथमदर्शनींच दर्शनार्थींच्या मनावर छाप पडत असेल तर ती मंदिराच्या प्रवेशद्वाराची. हें उत्तराभिमुख प्रवेशद्वार




श्रीगजानन मंदिराचें उत्तरद्वार–प्रवेशद्वार

भला थोरला हत्ती जाईल एवढें भव्य नी उंच आहे. काळचा दगडांनीं बांधलेलें तें कलात्मक कोरीव काम प्रेक्षणीय आहे. या

प्रवेशद्वारांतून आंत गेल्यानंतर महाराजांच्या आराध्य देवतेचें— श्रीरामाचें - मंदिर दृष्टीस पडतें. हें मंदिर जरी अलिकडील काळांत म्हणजे १९०७ सालांत बांधण्यास सुरूवात करून सात वर्षांत १९१४ त पूर्ण केलेलें असलें तरी त्याची बांधणी, घडण प्राचीन शिल्पकलेच्या नमुन्याबरहुकूम आहे. संपूर्ण मंदिर काळ्या पाषाणाचें आहे. त्यावरील बारीक नक्षीकाम अत्यंत प्रेक्षणीय असून मधून मधून रामायण-महाभारतांतील प्रसंग त्यावर खोदलेले आहेत. तें प्रमाणबद्ध रेखीव कोरीव बांधकाम पाहून मनाला प्रसन्नता लाभते. मंदिराच्या चारहि बाजूंना मंदिराच्या प्रतिकृति असून त्यावर लहान लहान सुवर्णकळस आहेत. आणि मधला मुख्य मंदिराचा भाग सर्वांत उंच असून त्यावर मोठा सुवर्णकळस सुवर्णकांतीनें चकाकत असतो.

श्रीराममंदिराच्या पश्चिम बाजूलाहि एक फार भव्य नि अत्यंत सुंदर शिल्पकलेचा उत्कृष्ट नमुना म्हणून प्रेक्षणीय



मंदिराचा पश्चिम दरवाजा

दरवाजा आहे. दोन्ही दरवाजे व मंदिर यांचा देखावा प्रेक्षकांचें व भाविकांचें मन आकर्षून घेतो.

श्रीराममंदिराच्या पुढील भागांत प्रशस्त सभामंडप आहे. गाभाऱ्यांत श्रीगजानन महाराजांची आराध्यदेवता श्रीरामप्रभु, सीता व लक्ष्मण यांच्या सुंदर मूर्ति आहेत. मंदिराचें बांधकाम




राम—सीता—लक्ष्मण : मंदिरांतील मूर्ति

महाराजांच्या आज्ञेनुसार त्यांच्या हयातींतच, त्यांच्याच देखरेखीखालीं सुरू झालें. महाराज समाधिस्थ झाल्यानंतर तें १९१४ सालापर्यंत चालून पूर्ण झालें. अजूनहि सभामंडपाच्या वरच्या मजल्याचें काम चालूच आहे. मुख्य मंदिर व मंदिराच्या आजूबाजूचें बांधकाम मात्र पूर्ण झालेलें आहे.

हें श्रीराममंदिर गांवाच्या पूर्व टोकाला दोन एकर शेतजमीन घेऊन तेवढ्या क्षेत्रफळाच्या परिसरांत बांधलेलें आहे. मंदिराच्या पश्चिम भागाला गांववस्ती आहे. मंदिराच्या मागील बाजूला धर्मशाळावजा अशी फार मोठी इमारत बांधलेली आहे. तींत पुष्कळशा खोल्या काढलेल्या आहेत. ही इमारत देखील

काळ्या पाषाणांनीं सुंदर व मजबूत बांधलेली आहे. या इमारतींतील खोल्यांतून भाविक यात्रेकरूंना राहण्याची फार सोय झालेली आहे. त्यासमोरच उंच ओटा असलेली ओसरी (व्हरांडा)




श्रीराममंदिर

आहे. लग्नकार्य प्रसंगीं व उत्सवाच्या प्रसंगीं, तशाच मोठाल्या समारंभाच्या वेळीं या इमारतीचा फार चांगला उपयोग होतो. इमारतीच्या दगडी भिंतींत मोठाल्या लोखंडी वाकड्या खुंट्या बसविलेल्या आहेत. सारी ओसरी (व्हरांडा), खोल्या, आवारांतील सारी जागा फरसबंद केलेली आहे.

## महाराजांचें समाधिस्थान :

मंदिराच्या पूर्वभागीं श्रीगजानन महाराजांचें लहानसें समाधिमंदिर आहे. जवळच एक मोठी विहीर आहे. दक्षिणेकडील प्रवेशद्वाराजवळच एक लहानशी विहीर आहे. तिच्या पाण्याचा फारसा उपयोग होत नसावा असें दिसतें. मंदिराच्या पूर्वेकडील ओसरींतच श्रीगजानन महाराजांच्या संस्थानचें मुख्य कार्यालय आहे. त्याला लागूनच असलेल्या खोल्यांतून पुस्तकविक्री खातें, वर्गणी-देणगी खातें, धान्यकोठी, भांडीं कुंडीं-भांडार इत्यादि जीं निरनिराळीं खातीं आहेत त्यांच्या कचेऱ्या आहेत.

श्रीराममंदिराला अगदी लागूनच श्रीराम, सीता, लक्ष्मण यांच्या स्थानामागेंच पण भुयारांत श्रीगजानन महाराजांचें



समाधिस्थानांतील महाराजांची मूर्ति

समाधिस्थान आहे. तें भुयारांत १५ फूट खोल आहे. त्यांत ११ फूट × ११ फूट क्षेत्रफळाचें समाधिस्थान बांधलेलें आहे. भुयारांत

उतरण्यास व वर बाहेर येण्यास पायऱ्यांची वाट आहे. वाटेच्या पायथ्याजवळच लहानसा दगडी दिंडी दरवाजा आहे. त्या दिंडी दरवाज्यासमोर महाराजांची शुभ्र संगमरवरी पाषाणाची मूर्ति बसविलेली आहे. ती मूर्ति मनमोहक, नयनरम्य अशी सुंदर आहे. मूर्ति अडीच फूट उंचीची असून तिला पोशाख केलेला असतो. महाराजांच्या डोक्यावर रेशमी कोशाचा फेटा बांधलेला असतो. त्यामुळें तर महाराज भाविकांना, भक्तजणांना, दर्शनार्थींना प्रत्यक्ष दर्शनच देत आहेत असा भास होतो.

महाराजांचें आराध्यदैवत श्रीरामप्रभु, सीता व लक्ष्मण यांच्याहि मूर्ति अत्यंत सुंदर आहेत. महाराजांनीं आपल्या हयातींतच दाखविलेल्या जागीं भक्तजनांनीं उत्खनन केलें. त्या उत्खननांतच ह्या मूर्ति सांपडलेल्या आहेत. त्याशिवाय अंबिका-देवी, गणपति, जयविजय अशा आणखी तीन मूर्ति सांपडलेल्या आहेत. त्या देखील प्राचीन शिल्पकलेचे नमुने म्हणून प्रेक्षणीय आहेत. मंदिराच्या समोरच सभामंडपांत त्या बसविलेल्या आहेत.

श्रीगजानन महाराजांचें हें आराध्य-देवता-मंदिर शिल्प-कलेचा उत्कृष्ट नमुना म्हणून शेगांवच्या पंचक्रोशींत प्रेक्षणीय गणलें जातें.

**यात्रा-उत्सव :**

तीर्थस्थान म्हटलें कीं तेथें यात्रा, उत्सव मेळावा हें सारें आलेंच. श्रीगजानन महाराज हे तर भक्तजनांची इच्छापूर्ति करणारी जागृत देवताच होती व आजहि आहेच. मग शेगांवला यात्रा, उत्सव होणें अगत्याचें होऊन बसलें, तर त्यांत नवल कसलें ?

शेगांवला महाराजांची पुण्यतिथि व त्यांच्या आराध्य-देवतेचा श्रीरामप्रभूचा जन्मदिवस–रामनवमी–हे दोन प्रमुख उत्सव फार मोठ्या प्रमाणावर साजरे केले जातात. त्यावेळीं

शेगांवला मोठी यात्रा भरत असते. पुण्यतिथीच्या वेळीं दहा पंधरा हजारावर लोक येतात. तर श्रीरामजन्मोत्सवाच्या वेळीं वीस पंचवीस हजारावर यात्रा भरते.

महाराजांची पुण्यतिथि भाद्रपद शुद्ध पंचमीला साजरी केली जाते. महाराजांचा भक्तगुण जेथें जेथें पसरला आहे तेथें तेथें देखील ते भक्तजन ही पुण्यतिथि मोठ्या श्रद्धेनें साजरी करतात. दहा दिवसपर्यंत 'श्रीगजानन विजय' पोथीचें पारायण, कथाकीर्तनें, प्रवचनें, भजनें दिंड्या, पालख्या इत्यादि कार्यक्रम अखंड चाललेले असतात. दहा दिवस या कार्यक्रमांनीं भरगच्च असतात. शेवटच्या दिवशीं दहींहांडी, काला होऊन यात्रेला आलेल्या सर्वच यात्रेकरूंना महाराजांचा प्रसाद म्हणून पक्वान्नाचें सुग्रास भोजन देण्यांत येतें.

असाच उत्सव श्रीराम नवमीलाहि केला जातो. त्यावेळीं तर पंचवीस तीस हजारावर यात्रा लोटते. त्यावेळीं देखील महाराजांच्या कृपाप्रसादानें सारा प्रसंग यथासांग पार पडतो व सर्वांनाच मिष्टान्नाचें सुग्रास भोजन दिलें जातें. कशाचीच वाण पडत नाहीं. या दोन्ही प्रसंगीं जाति भेदाला मुळींच थारा दिला जात नाहीं. महाराजांच्या अवतारकार्याचें खरें खुरें मानवधर्म स्वरूप येथील सर्वच उत्सवप्रसंगीं दिसून येतें आणि या कलियुगांतहि पुण्यात्मे, धर्मात्मे, महात्मे पुरुष आपल्या अवतारकार्यानें जगदोद्धाराचें कार्य करीतच असतात याची प्रचीति, येऊं लागते.

याशिवाय शेगांव देवस्थानातर्फे दरवर्षी आषाढी व कार्तिकी एकादशी यात्रा, कृष्णजन्मोत्सव, दत्तजयंती, हनुमानजयंती, दासनवमी, दसरा आदि अनेक उत्सव व सण मोठ्या थाटानें साजरे केले जातात.

एकंदरींत शेगांव म्हणजे बाराहि महिन्यांचें यात्रास्थान झालेलें आहे, असें तेथील यात्रेकरूंच्या रहदारीवरून दिसून येतें.

उतरण्यास व वर बाहेर येण्यास पायऱ्यांची वाट आहे. वाटेच्या पायथ्याजवळच लहानसा दगडी दिंडी दरवाजा आहे. त्या दिंडी दरवाज्यासमोर महाराजांची शुभ्र संगमरवरी पाषाणाची मूर्ति बसविलेली आहे. ती मूर्ति मनमोहक, नयनरम्य अशी सुंदर आहे. मूर्ति अडीच फूट उंचीची असून तिला पोशाख केलेला असतो. महाराजांच्या डोक्यावर रेशमी कोशाचा फेटा बांधलेला असतो. त्यामुळें तर महाराज भाविकांना, भक्तजणांना, दर्शनार्थींना प्रत्यक्ष दर्शनच देत आहेत असा भास होतो.

महाराजांचें आराध्यदैवत श्रीरामप्रभु, सीता व लक्ष्मण यांच्याहि मूर्ति अत्यंत सुंदर आहेत. महाराजांनीं आपल्या हयातींतच दाखविलेल्या जागीं भक्तजनांनीं उत्खनन केलें. त्या उत्खननांतच ह्या मूर्ति सांपडलेल्या आहेत. त्याशिवाय अंबिका-देवी, गणपति, जयविजय अशा आणखी तीन मूर्ति सांपडलेल्या आहेत. त्या देखील प्राचीन शिल्पकलेचे नमुने म्हणून प्रेक्षणीय आहेत. मंदिराच्या समोरच सभामंडपांत त्या बसविलेल्या आहेत.

श्रीगजानन महाराजांचें हें आराध्य-देवता-मंदिर शिल्प-कलेचा उत्कृष्ट नमुना म्हणून शेगांवच्या पंचक्रोशींत प्रेक्षणीय गणलें जातें.

### यात्रा-उत्सव :

तीर्थस्थान म्हटलें कीं तेथें यात्रा, उत्सव मेळावा हें सारें आलेंच. श्रीगजानन महाराज हे तर भक्तजनांची इच्छापूर्ति करणारी जागृत देवताच होती व आजहि आहेच. मग शेगांवला यात्रा, उत्सव होणें अगत्याचें होऊन बसलें, तर त्यांत नवल कसलें ?

शेगांवला महाराजांची पुण्यतिथि व त्यांच्या आराध्य-देवतेचा श्रीरामप्रभूचा जन्मदिवस—रामनवमी—हे दोन प्रमुख उत्सव फार मोठ्या प्रमाणावर साजरे केले जातात. त्यावेळीं

शेगांवला मोठी यात्रा भरत असते. पुण्यतिथीच्या वेळीं दहा पंधरा हजारावर लोक येतात. तर श्रीरामजन्मोत्सवाच्या वेळीं वीस पंचवीस हजारावर यात्रा भरते.

महाराजांची पुण्यतिथि भाद्रपद शुद्ध पंचमीला साजरी केली जाते. महाराजांचा भक्तगुण जेथें जेथें पसरला आहे तेथें तेथें देखील ते भक्तजन ही पुण्यतिथि मोठ्या श्रद्धेनें साजरी करतात. दहा दिवसपर्यंत 'श्रीगजानन विजय' पोथीचें पारायण, कथाकीर्तनें, प्रवचनें, भजनें दिंड्या, पालख्या इत्यादि कार्यक्रम अखंड चाललेले असतात. दहा दिवस या कार्यक्रमांनीं भरगच्च असतात. शेवटच्या दिवशीं दहींहांडी, काला होऊन यात्रेला आलेल्या सर्वच यात्रेकरूंना महाराजांचा प्रसाद म्हणून पक्वान्नाचें सुग्रास भोजन देण्यांत येतें.

असाच उत्सव श्रीराम नवमीलाहि केला जातो. त्यावेळीं तर पंचवीस तीस हजारावर यात्रा लोटते. त्यावेळीं देखील महाराजांच्या कृपाप्रसादानें सारा प्रसंग यथासांग पार पडतो व सर्वांनाच मिष्टान्नाचें सुग्रास भोजन दिलें जातें. कशाचीच वाण पडत नाहीं. या दोन्ही प्रसंगीं जाति भेदाला मुळींच थारा दिला जात नाहीं. महाराजांच्या अवतारकार्याचें खरें खुरें मानवधर्म स्वरूप येथील सर्वच उत्सवप्रसंगीं दिसून येतें आणि या कलियुगांतहि पुण्यात्मे, धर्मात्मे, महात्मे पुरुष आपल्या अवतारकार्यानें जगदोद्धाराचें कार्य करीतच असतात याची प्रचीति, येऊं लागते.

याशिवाय शेगांव देवस्थानातर्फे दरवर्षीं आषाढी व कार्तिकी एकादशी यात्रा, कृष्णजन्मोत्सव, दत्तजयंती, हनुमानजयंती, दासनवमी, दसरा आदि अनेक उत्सव व सण मोठ्या थाटानें साजरे केले जातात.

एकंदरींत शेगांव म्हणजे बाराहि महिन्यांचें यात्रास्थान झालेलें आहे, असें तेथील यात्रेकरूंच्या रहदारीवरून दिसून येतें.

## दैनंदिन कार्यक्रम :

येथील दैनिक कार्यक्रम आंखीव आहे. त्याप्रमाणें सारीं कामें व्यवस्थित होतात. सूर्योदयापूर्वींच ५ वाजल्यापासून कार्यक्रमाला सुरूवात होते. प्रथम साधारण अर्धा तास सुस्वर सनई, चौघडावादन होतें. हें वादन इत्यादि गांवांतील साऱ्या लोकांना आणि दर्शनार्थी यात्रेकरूंना ऐकूं जावें म्हणून मंदिराच्या महाद्वारावर ध्वनिवर्धकाची कायम व्यवस्था केलेली आहे. नंतर भूपाळयांच्या ध्वनिमुद्रिका लावण्यांत येतात. ६-३० ते ७ पहिल्या पूजेला प्रारंभ होतो. श्रीराममंदिरांत श्रीराम, सीता व लक्ष्मण या त्रयमूर्तींची, भुयारांत श्रीगजानन महाराजांची आणि सभामंडपांत श्रीशंकराची पूजाअर्चा केली जाते. या तिन्ही पूजाअर्चा वेगवेगळे तीन पुजारी करीत असतात.

७ ते ७-३० महाराजांच्या पादुकांवर अभिषेक केला जातो. हा अभिषेक संस्थानातर्फे व भक्तजनांतर्फे फक्त पुजारीच करूं शकतो. श्रीशंकरावर अभिषेक मात्र भक्तजन स्वत: करतात.

७-३० ते ८ अन्य भक्तजन यात्रेकरू यांच्याकडून पूजा केली जाते; मात्र तीहि पुजाऱ्याकडूनच. भुयारांत जी पूजाअर्चा केली जाते तीहि पुजाऱ्याच्याच हस्तें होते. श्रीशिवपिंडी, तक्तावरील श्रीगजानन महाराजांचें तसबीर (फोटो) यांची पूजा करण्याची मात्र सर्वांना मोकळीक असते.

हा सारा पूजाअर्चेचा कार्यक्रम चालूं असतांना वीणावादन अखंड चालूच असतें.

८ ते ११ पर्यंत दर्शनाभिलाषी लोकांची ये जा सुरू होते व ती पुढें सारखी चाललेलीच असते.

पुढें दुपारीं १२ वाजतां नैवेद्य समर्पण केला जातो; आणि नंतर आरति होते, ती अशी.

११३८०/२१

## गजानन महाराजांची आरती :

जय जय सत् चित्स्वरूपा स्वामी गणराया ।
अवतरलासी भूवर जड-मुढ ताराया ॥ जयदेव जयदेव ॥ धृ० ॥
निर्गुण ब्रह्म सनातन अव्यय अविनाशी ।
स्थिरचर व्यापुन उरलें जें या जगतासी ॥
तें तूं तत्त्व खरोखर निःसंशय असनी ।
लीलामात्रें धरिलें मानव देहासी ॥ जयदेव जयदेव० ॥ १ ॥
होउं न देशी त्याची जाणिव तूं कवणा ।
करुनी ' गणिगण गणांत बोते ' या भजना ॥
धाता हरिहर गुरुवर तूंचि सुखसदना ।
जिकडे पहावें तिकडे तूं दिससी नयना ॥ जयदेव जयदेव० ॥ २ ॥
लीला अनंत केल्या बंकटसदनास ।
पेटाविलें त्या अग्नीवांचुनि चिलमेस ।
क्षणांत आणिलें जीवन निर्जल वापीस ।
केला ब्रह्मगिरीच्या गर्वाचा नाश ॥ जयदेव जयदेव० ॥ ३ ॥
व्याधि वारून केलें कैकां संपन्न ।
करविलें भक्तांलागीं विठ्ठलदर्शन ।
भवसिंधू हा तरण्या नौका तव चरण ।
स्वामी दासगणूचें मान्य करा कवन ॥ जयदेव जयदेव० ॥ ४ ॥

आरती चालू असतांना चौघडा झडत असतो.

१२ ते १ पर्यंत प्रसादग्रहण होतें. त्यावेळीं तेथील २५-३० कर्मचारी लोकांचें भोजन होतें. हें सदावर्त नेहमींचेंच सुरू असतें. यावेळीं प्रसंगविशेषीं कांहीं निमंत्रित मंडळीहि प्रसाद-ग्रहणासाठीं आलेली असतात.

दुपारचे १ वाजल्या नंतर पुजारी तळघर, राममंदिर कुलूपें लावून बंद करतात. आपापल्या घरीं जातात. मग दरवाजाच्या गजांतून मात्र दर्शन घेतां येतें. येथें पहिला कार्यक्रम संपतो.

दुसऱ्या प्रहरचा दुसरा कार्यक्रम दुपारींच १ ते ६ पर्यंत चालतो. हा वेळ दर्शन घेण्याचा असतो.

सायंकाळीं ६ वाजल्यानंतर तिसरा कार्यक्रम सुरूं होतो. प्रथम सनई–चौघडा वादन होतें. ७ ते ७-३० आरती होते व प्रसाद वांटला जातो. ७-३० ते १० दर्शनार्थी भाविकांची ये-जा सुरू असते.

दिवसभर पाळीपाळीनें वीणानाद अखंड चालूच असतो.

दर गुरुवारीं व दर एकादशीच्या दिवशीं दैनिक कार्यक्रमाप्रमाणें पूजाअर्जा असतेच; पण विशेष कार्यक्रम म्हणजे यावेळीं सकाळीं ९ ते १० पर्यंत महाराजांच्या पादुका पालखींत ठेवून ती देवळाच्या आंवारांतच फिरविली जाते. पालखीसमोर भजनी मंडळीचीं दिंडी असते.

आषाढी व कार्तिकी एकादशीच्या दिवशीं तर पालखीची भव्य मिरवणूक निघते व ती शेगांवभर फिरून येते. त्या मिरवणुकीचा देखावा म्हणजे ‘अवतरलें पंढरपूर। या भूवर शेगांवीं।’ असाच असतो.

## संस्थानची व्यवस्था व प्रगति

श्रीगजानन महाराजांच्या भक्तजनांची संख्या दिवसेंदिवस वाढत चालली आहे. ह्यामुळें या देवस्थानाची दिवसेंदिवस भरभराट होत आहे. या संस्थानाला भाविकांकडून हजारों रुपयांच्या देणग्या मिळालेल्या आहेत. विदर्भांतील चारहि जिल्ह्यांतून साडेपांचशें एकरांहून अधिक शेतजमीन देवस्थानाला दान मिळालेली आहे. देवस्थानाला दरवर्षी भाविक यात्रेकरूंकडून दहा हजारापर्यंत देणगी म्हणून मिळत असावी असा अंदाज आहे. शिवाय मंदिरांतील पेटयांमधूनहि सहासात हजाराच्या जवळपास ऐवज जमत असावा असें दिसतें.

श्रीगजानन महाराजांचे जे दूरदूरचे भक्तजन आहेत त्यांच्याकडूनहि टपालानें व इतर मार्गांनीं दहा बारा हजारापर्यंत देणग्या येत असतात. शेतीचें सालीना उत्पन्न अंदाजें खर्चंवेच वजा जातां दहाअकरा हजार रुपयांचें असावें.

एकंदरींत तीस चाळीस हजारांच्या घरांत देवस्थानाचें वार्षिक उत्पन्न आहे.

श्रीगजानन महाराज संस्थान १९५२ च्या सार्वजनिक विश्वस्तनिधि कायद्यान्वयें नोंदण्यांत आलेलें आहे. त्या. प्रमाणें विश्वस्त मंडळ नेमण्यांत आलेलें आहे. त्याचे १२ सभासद आहेत. अध्यक्ष, चिटणीस, कोषाध्यक्ष आदि अधिकारीवर्ग असून ते व्यवस्थितपणें, प्रामाणिकपणानें व अत्यंत चोख कारभार करीत असतात.

मंदिरांत एकाच वेळीं दोन हजार माणसांच्या भोजनाची व्यवस्था होऊं शकेल इतकीं स्वयंपाकाचीं तांब्यापितळेचीं भांडींकुंडीं, पेले, कढया आदि साहित्य आहे. सतरंज्या, बिछाईत आदि सामानहि भरपूर आहे. लग्नें, मुंजी, व्रतबंधनादि मंगलकार्यासाठीं कोणत्याहि बाबीचें भाडें न घेतां हें सामान वापरण्याकरितां दिलें जातें. यजमान स्वखुषीनें जी देणगी देईल ती संस्थानाच्या कोषांत जमा केली जाते. देवस्थानाच्या कोठींतून हळद, मोहऱ्या, तिखट, मीठादि पदार्थापासून तों तूप, तेल, साखर, सुपारी, वेलदोडे, लवंगा इत्यादि सर्व पक्वान्नास उपयोगी पडणाऱ्या पदार्थांपर्यंत सर्व जिनसा मिळण्याची सोय येथें केली जाते. अर्थात् पत्रावळी, द्रोण यांचीहि व्यवस्था आहेच. त्या मालाबद्दल योग्य ती देणगी देणें भाविकांचें कर्तव्यच ठरतें. सोय होते नि दगदग, त्रास पडत नाहीं. सर्व कांहीं घरच्यासारखें.

शेगांवच्या या देवस्थानांत होणारे मुख्य दोन उत्सव आणि साल भरांत होणारे अन्य लहानमोठे उत्सव यांच्याकरितां देवस्थानाला वार्षिक बराच मोठा खर्च करावा लागतो. दररोज ५०–६० माणसें, दर गुरुवारीं सुमारें दीड दोनशें भाविक मंडळी, पुण्यतिथीच्या वेळीं दहा हजारापर्यंत आणि श्रीरामनवमीच्या प्रसंगीं पंधरा ते वीस हजारापर्यंतचे यात्रेकरू यांना श्रीगजानन महाराजांचा प्रसाद म्हणून देवस्थानतर्फे

पक्वान्नाचें सुग्रास भोजन दिलें जातें. या कामीं पंधरा ते वीस हजारापर्यंत वार्षिक खर्च होत असतो.

याशिवाय श्रीगजानन महाराजांचे व त्यांच्या आराध्य देवतेचे पुजारी, आणि देवस्थानच्या सर्वांगीण व्यवस्थेसाठीं लागणारा कर्मचारी वर्ग पगारी आहे. त्यांचें वेतन, ठिकठिकाणचा शेतीखर्च, इमारतींची डागडुजी, नवीन बांधकाम, वीज, रंग सफेती, तेलपाणी आदि किरकोळ खर्च, अन्नदान खर्च यासाठीं देखील पांचसहा हजारापर्यंत खर्च होत असतो.

दिवसेंदिवस हें देवस्थान यात्रेकरूंच्या, भाविकांच्या श्रद्धेचें, आत्मसमाधानाचें, संतोषाचें, इच्छापूर्तीचें, स्थान बनत चालल्या-मुळें तेथील विश्वस्त मंडळाला देवस्थानाच्या इमारतींत खोल्यांची, शौचकुपांची, स्नानगृहांची अधिक वाढ नि सोय करावी लागत आहे. त्याप्रमाणें आवश्यक त्या सर्व सुखसोयी होत आहेत.

यात्रेकरूंना खोल्यांतून तीन दिवसपर्यंत फुकट रहातां येतें. यात्रेकरूंना सामानसुमान लागल्यास तेंहि दिलें जातें.

असें आहे हें श्रीगजानन महाराजांचें विश्रामस्थान शेगांव.

**गजाननपदीं निष्ठा ठेवा । सुख-अनुभव सर्वदा घ्यावा ॥**
**कुतर्कासी मुळीं न द्यावा । ठाव आपुल्या मानसीं ॥**
**एकदां तरी वर्षांतून । घ्यावें गजाननाचें दर्शन ॥**
**एकदां तरी पारायण । करा श्रीगजानन चरित्राचें ॥**

◆◆◆

ग्रंथालय ... क्र. ११३८४

REFBK-0011394